अति.महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
जा.क्र.:- अतिमआ(ज)/सा.प्र.वि./ २४१२
दिनांक :- १८/०५/२०२३

-: कार्यालय परिपत्रक :-

विषय:- दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनानिमित्त शपथ घेणेबाबत.
संदर्भ:- १) राज्य शासनाकडील परिपत्रक क्र.जपुती/२०२२/प्र.क्र.११२/कार्या.२९, दि.१८/०१/२०२३.
२) नगरसचिव कार्यालयाचे पत्र जा.क्र.१५१, दि.१६/०५/२०२३.

दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनानिमित्त शपथ घेणेबाबत कार्यक्रम आयोजित करणेकामी महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र.१ चे परिपत्रकान्वये सूचित केले आहे.

त्यानुसार पुणे महानगरपालिकेमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनानिमित्त शपथ घेण्याचा कार्यक्रम रविवार, दि.२१/०५/२०२३ रोजी सकाळी १०.३० वा. (दहा वाजून तीस मिनिटे) पुणे महानगरपालिका भवन, हिरवळ येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

सदर दिवशी शासकीय सुट्टी असली तरीही या कार्यक्रमासाठी सर्व अधिकारी व सेवकांनी नेमून दिलेल्या ठिकाणी व वेळी उपस्थित रहावे. या अनुषंगाने सर्व खातेप्रमुख यांनी आपल्या नियंत्रणाखाली सर्व विभाग व उप विभागातील सेवकांना अगोदर किमान १० मिनिटे महापालिका भवन प्रांगणात उपस्थित राहण्याच्या सूचना द्याव्यात.

१८/५/२३

(विकास ढाकणे)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत:-
१) मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा
२) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/वि/इ)
पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहितीस्तव...

३) सर्व खातेप्रमुख / महापालिका सहाय्यक आयुक्त/विभाग प्रमुख
पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहिती व जरूर त्या कार्यवाहीसाठी रवाना.